**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.संतोष ज्ञानेश्वर चिपडे
मु.पो.पिंपळगाव(धस), ता.बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महावितरण कंपनी, बार्शी , जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता,
महावितरण कंपनी, बार्शी , जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४३+३८५ /सोलापूर / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख (वि.अ.नि.का.) | दि.१७.६.२००८ व १८.६.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संतोष ज्ञानेश्वर चिपडे
मु.पो.पिंपळगाव(धस), ता.बार्शी, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता;
महावितरण कंपनी, बार्शी , जि.सोलापूर श्री.अविनाश कुंडलीक सोहनी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता,
महावितरण कंपनी, बार्शी , जि.सोलापूर श्री.राजेंद्र दिगंबर गाढवे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३१.१०.२००६ (अ.क्र.१४३)<br>दि. ७.१०.२००६ (अ.क्र.३८५) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२.१२.२००६ (अ.क्र.१४३)<br>दि. ३.११.२००६ (अ.क्र.३८५) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२८.१२.२००६ (अ.क्र.१४३)<br>दि. ७.११.२००६ (अ.क्र.३८५) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.१२.२००६ |
| ८ | **<u>मुळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>**<u>अपील क्र.३८५+१४३</u>**<br><br>कार्यकारी अभियंता श्री.नाईकवाडी साहेब यांच्या काळातील बार्शी ते कुर्डुवाडी ३३ केव्ही लाईनवरील फेल ट्रान्सफॉर्मरमधील ऑईलबाबत. एकूण ऑईल निघाले किती, नवीन आणले किती, गेटपास सहित व नवीन ऑईल आणण्याचे प्रयोजन काय, तसेच तिन्ही सब डिव्हिजनमध्ये सध्या ट्रान्स्फॉर्मर किती जळाले, किती चालू झाले तारीखवाइज(गेटपाससहित), ट्रान्सफॉर्मर दुरुस्तीचे काम करणारे एकूण किती कंत्राटदार या विभागात आहेत. गॅरंटी पिरीयडचे किती ट्रान्स्फॉर्मर जळाले व दुरुस्त झाले व त्याला किती खर्च आला, उपविभागनिहाय तारीखवाईज देणे. | |

## <u>विवेचन</u>

जळालेले ट्रान्स्फॉर्मर व बार्शी ते कुर्डुवाडी ३३ केव्ही लाईन याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.संतोष ज्ञानेश्वर चिपडे यांनी जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महवितरण कंपनी, बार्शी, जि.सोलापूर यांच्याकडे मागितली होती. त्या संदर्भात अपुऱ्या माहितीबाबत प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांनी योग्य दखल न घेतल्याच्या कारणावरुन श्री.चिपडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

दि.१७.६.२००८ व १८.६.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. संबंधित अधिकाऱ्यांकडून व विभागांकडून माहिती

घेऊन विहित मुदतीत श्री.चिपडे यांना देण्यात आली असल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.राजेंद्र दिगंबर गाढवे व अपिलीय प्राधिकारी श्री.अविनाश कुंडलीक सोहनी यांनी प्रपत्रात नमूद केले, तर ट्रान्सफॉर्मर जळालेले वेळेत न मिळाल्याने व गैरमार्गाने ट्रान्सफॉर्मर दिल्यामुळे अतोनात नुकसान झाले, असे श्री.चिपडे यांनी नोंदविले. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलांची सुनावणी घेण्यात आली.

ट्रान्स्फॉर्मर जळाल्यानंतर बदलून मिळण्याचा अपीलकर्त्याचा आग्रह होता व तो अपीलकर्त्यास उशिरा मिळाला, असे उभय बाजूंच्या निवेदनातून आयोगापुढील सुनावणीत स्पष्ट झाले.

बार्शी ते कुर्डुवाडी ही लाईन आपल्या विभागातून जात असली तरी ती डेड आहे, ती संपूर्ण काढण्याची अपीलकर्ता यांची मागणी आहे व आपल्या विभागाची ती जबाबदारी नाही, असे जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महावितरण कंपनी, बार्शी श्री.राजेंद्र दिगंबर गाढवे यांनी स्पष्ट केले. या लाईनवरील तार व चॅनेल कोणत्या विभागाकडील आहेत आणि ती कोठे उपयोगात आणली, ही माहिती मिळावी, अशी मागणी असल्याचे श्री.चिपडे यांनी सांगितले. ठेकेदाराच्या कक्षेतील ही माहिती असल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.राजेंद्र गाढवे व अपिलीय प्राधिकारी श्री.अविनाश सोहनी यांनी नमूद केले. 'लाईन चोरीला जात असल्यामुळे काढली असल्यास लाईन चोरीला गेल्यानंतर कोणत्या पोलीस स्टेशनला गुन्हा नोंद करण्यात आला त्याची प्रत व गुन्हा दाखल केला नसल्यास लाईन काढून कोठे नेली त्याची चौकशी होऊन दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी,' ही श्री.चिपडे यांनी केलेली मागणी महितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अंतर्गत येत नाही. मात्र श्री.चिपडे यांना देय असलेली ऊर्वरित माहिती १५ दिवसात द्यावी, ती वस्तुस्थितीनिहाय असल्याची शहानिशा करावी, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. परंतु आपल्याला खोटी माहिती दिल्याचे श्री.चिपडे यांनी आयोगाला दि.१८.७.२००८ रोजी प्राप्त झालेल्या पत्रान्वये कळविले. त्याबाबत आयोगाने दि.१४.२.२००८ च्या पत्रान्वये विचारणा केल्यानुसार दिलेल्या माहितीबाबत अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी

अभियंता, महावितरण कंपनी, बार्शी श्री.अविनाश सोहनी यांनी दि.२.९.२००८ रोजी अहवाल सादर केला. आपल्याला माहिती प्राप्त झाल्याचे व तक्रार राहिली नसल्याचे, तसेच आपण मागितलेली माहिती मिळाली असून त्यावेळचे अधिकारी निवृत्त झाल्यामुळे अपील क्र.१४३ व ३८५ निकाली काढावी, असे श्री.चिपडे यांनी दि.१०.९.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगाला कळविले.

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२९.८.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.जयराम अण्णा बेंडखळे
११०८, ई, हिंदू-पद्मा अपार्टमेंटस, फ्लॅट क्र.८,
के.डी.सी.सी.बँकेसमोर, शाहुपुरी, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रभारी उपजिल्हाधिकारी (महसूल),
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा रजा राखीव तहसीलदार, कार्यासन-६,
वसुली विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४४ / कोल्हापूर /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.७.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.जयराम अण्णा बेंडखळे
११०८, ई, हिंदू पद्मा अपार्टमेंटस, फ्लॅट क्र.८,
के.डी.सी.सी.बँकेसमोर, शाहुपुरी, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रभारी उपजिल्हाधिकारी (महसूल),
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर श्री.शिवाजीराव कादबाने

**जन माहिती अधिकारी** तथा रजा राखीव तहसीलदार, कार्यासन-६,
वसुली विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर श्रीमती एम.एम.तोडकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.७.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.९.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर यांनी ग्राहक संरक्षण कायदा कलम २५ व २७ खाली वसुलीसाठी दिलेला आदेश क्र.ग्रातनिमं/कोजि/अंमलबजावणी/०४/१३/०४, दि.४.११.२००६ व सुधारित आदेश क्र.कोजिमं/कलम-२७/वसुली/२००५/ भुदरगड /३ / कोल्हापूर, दि.२३.३.२००५ नुसार पुढील कार्यवाहीसाठी कोणत्या अधिकाऱ्याला आदेश दिला व केव्हा? संबंधित कार्यालयाने पुढे कोणती कार्यवाही केली? जप्त केलेल्या गट क्र.१००३/६अ व ७अ उत्तूर, ता.आजरा या मालमत्तेचा लिलाव अद्याप न होण्याची कारणे कोणती? जिल्हाधिकारी कार्यालयाने सदर प्रकरणी कोणता पाठपुरावा केला? वसुली कार्यवाही न झाल्याबद्दल कोणत्या अधिकाऱ्यास जबाबदार धरण्यात आले? कोणती कार्यवाही केली? ग्राहकमंचाच्या आदेशाची अंमलबजावणी सिव्हिल कोर्टाच्या डिक्रीप्रमाणे करावयाची असून इतका विलंब होण्याची कारणे कोणती? ग्राहकमंचाला या संदर्भात कळविण्यात आले का? नसल्यास का नाही? टास्कफोर्सचे प्रमुख न्यायमूर्ती कोच यांच्याशी या संदर्भात पत्रव्यवहार केला का? नसेल तर का नाही? | |

## विवेचन

जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर यांनी ग्राहक संरक्षण कायदा कलम २५ व २७ खाली वसुलीसाठी दिलेल्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीबाबत आठ मुद्दयांची विचारणा जन माहिती अधिकारी तथा रजा राखीव तहसीलदार, कार्यासन-६, वसुली विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांच्याकडे अपीलकर्ता श्री.जयराम अण्णा बेंडखळे यांनी केली होती. विहित मुदतीत त्यांनी उत्तरे दिली नाहीत, म्हणून अपिलीय प्राधिकारी तथा प्रभारी उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांच्याकडे अपील केल्यानंतर जन माहिती अधिकाऱ्यांनी आपल्याला सविस्तर उत्तर दिले. परंतु मूळ अर्जाच्या तारखेनंतर ८१ दिवसांनी उत्तर

मिळाले, म्हणून त्यांच्यावर शास्तीसह कारवाई व्हावी, या मागणीसाठी श्री.बेंडखळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.१३.५.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. दिलेली माहिती चुकीची व अपुरी आहे. जन माहिती अधिकारी तथा रजा राखीव तहसीलदार, कार्यासन-६, वसुली विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांना शास्ती लावावी व त्यांची चौकशी होऊन दंडात्मक कार्यवाही होण्यासाठी शिफारस व्हावी, तसेच सहकार न्यायालयात संदर्भित विषयात दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या दाव्याचा निर्णय लौकर व्हावा, असे श्री.बेंडखळे यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले. उभय घटकांत एकमत झाले नाही, त्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

आपल्याला माहिती मिळाली, पण ती विलंबाने दिलेली आहे. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.आर.बी.उगले यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी श्री.बेंडखळे यांनी लेखी व तोंडी केली. श्री.बेंडखळे यांनी अनेक प्रश्नांमध्ये खुलासेवजा मागणी केलेली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.उगले यांनी त्यावर कार्यवाही केली, असे विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीमती एम.एम.तोडकर यांनी नमूद केले. श्री.बेंडखळे यांच्या अर्जावरील कार्यवाही व विलंबाच्या अनुषंगाने शास्तीबाबतचा खुलासा श्री.उगले यांनी १५ दिवसात आयोगाला सादर करावा, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीचया वेळी दिला. विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीमती तोडकर यांनी श्री.उगले यांच्याशी संपर्क साधून हा खुलासा प्राप्त करुन घ्यावयाचा होता. त्यानुसार श्री.उगले यांनी लेखी खुलासा दि.२३.७.२००८ रोजी आयोगाला सादर केला.

भुदरगड नागरी सहकारी पतसंस्थेची उत्तूर, ता.आजरा, जि.कोल्हापूर येथील मालमत्ता जप्त करुन तिचा लिलाव करुन वसुली करावी, असा आदेश जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर यांनी दि.२३.३.२००५ रोजी दिला. या आदेशानुसार कार्यासन-६, वसुली विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती आपण मागितली होती. परंतु आपल्याला दिलेल्या उत्तरामध्ये

नव्हती. सदरची माहिती तहसीलदार, भुदरगड व आजरा यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन ती श्री.बेंडखळे यांना पुरविण्यात आलेली आहे. या कामामध्ये मी जाणुनबुजून किंवा हेतु:पुरस्सर माहिती नाकारली नाही किंवा माहिती लपविण्याचाही प्रकार घडलेला नाही,' असे श्री.उगले यांनी दि.२३.७.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या खुलाशात विस्ताराने नमूद केले आहे.

श्री.बेंडखळे यांनी खुलासा, अभिप्राय याची मागणी केली असून ती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत 'माहिती' ठरत नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.आर.बी.उगले यांनी माहिती अर्जावर कार्यवाही केली, परंतु विहित मुदतीत अर्जदाराला ती कळविण्याची दक्षता घेतली नाही. या अनुषंगाने अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्यांना दिलेली समज योग्य आहे. सन २००५ मध्ये वसुलीचा आदेश झाल्यानंतरही तत्परतेने कार्यवाही झाली नाही, अशी श्री.बेंडखळे यांची तक्रार असून त्याबाबतची वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या निवेदनावरुन स्पष्ट होते. हे पाहता श्री.बेंडखळे यांची शास्ती व नुकसानभरपाई याबाबतची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

## आदेश

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ११.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुधाकर रंगोजी मनसुख
२०/१, पुण्याई नगर, पंचशील बिडिंग, धनकवडी, पुणे-४३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४४९ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुधाकर रंगोजी मनसुख
२०/१, पुण्याई नगर, पंचशील बिडिंग, धनकवडी, पुणे-४३

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५ श्री.सुरेश जगताप

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५ प्रतिनिधी श्री.शाम ढवळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.९.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मौजे पाषाण, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं.१४०/२, क्षेत्र २ हे.३७आर या मिळकतीचे बांधकाम चालू करण्याकरिता किंवा इतर काही कारणांकरिता अथवा विषयांकरिता आपणांकडे दाखल करण्यात आलेली सर्व कागदपत्रे. | |

## विवेचन

आपण मागितलेल्या माहितीसाठी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये घेतलेल्या शुल्काबरोबरच संबंधित कागदपत्रांच्या प्रती छायांकित करण्याचा खर्चही आपल्याकडूनच घेतला. जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका यांच्या या कृतीविरुध्द अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका याच्याकडे अपील केले. जादा घेतलेली रक्कम परत देण्याचे तोंडी आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दिले, मात्र लेखी आदेश दिले नाहीत व आपल्याला रक्कमही परत मिळाली नाही, या कारणावरुन श्री.सुधाकर रंगोजी मनसुख यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपल्याला माहिती मिळाली, परंतु नियमाने होणाऱ्या रु.२६२० या शुल्काव्यतिरिक्त छायांकित प्रती करण्यासाठी रु.२९२०/-हा खर्च आपल्यालाच करावयास लावला. ती रक्कम परत मिळालेली नाही, असे प्रतिपादन श्री.मनसुख यांनी आयोगापुढील सुनावणीत केले. याप्रमाणे अर्जदारालाच छायांकित प्रतींची रक्कम शुल्काव्यतिरिक्त खर्च करावयास लावणे योग्य नाही, म्हणून ते करावयास लावणारे तत्कालीन जन माहिती अधिकारी व संबंधित कर्मचारी यांनी ही रक्कम त्याना परत करावी, महापालिकेच्या निधीतून ती न देता ती चूक करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी वैयक्तिकरीत्या द्यावी, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार श्री.मनसुख यांना दि.२९.८.२००८ रोजी रु.२९२० समक्ष देण्यात आल्याचे, त्यांच्या पोहोच

पावतीसह अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका यांनी आयोगाला दि.१७.९.२००८ च्या निवेदनान्वये अवगत केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२०.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. रामदास वामन बनसोडे
रा. आळंदी देवाची, ता.खेड, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४६७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २६.८.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. रामदास वामन बनसोडे
रा. आळंदी देवाची, ता.खेड, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८
श्री. सुभाष डुंबरे

**जन माहिती अधिकारी** सहाय्यक आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८
डॉ. नागकुमार कुणचगी

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाच्या लेखा परीक्षक अहवालातील प्रलंबित आक्षेपांची पूर्तता व आक्षेपाधीन वसुलीच्या रकमाबाबत, मुख्यलेखापाल यांचेकडील पत्र

क्रं.लेखा/लेप/कावि/३९४/०३ दि. ४.७.२००० ची प्रत, महापालिका परिसरातील खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांना मुशहिरा वाटपासाठी रू.३०,०००/- देणेत आले होते. याबाबतचा आक्षेप पूर्तता तपशील, आरोग्याधिकारी यांना रू.२०,०००/- दुर्बिणीद्वारे स्त्री शस्त्रक्रियेसाठी आगाऊ अदा केलेबाबतचे कागदपत्राची प्रत, वैद्यकीय अधिकारी, आकुर्डी यांना रू. ५०,०००/- कुटुंब कल्याण कार्यक्रमासाठी आगाऊ अदा केले, सदर रकमेचे समायोजन झाले किंवा कसे याबाबत माहिती व इतर अनुषंगिक मुद्दयांची माहिती

## विवेचन

अपीलकर्ता श्री. रामदास वामन बनसोडे यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाच्या संदर्भातील सन १९८४ ते १९८६ या काळातील लेखा परीक्षण अहवालातील प्रलंबित आक्षेपांच्या पूर्ततेबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांच्याकडे मागितली होती. वारंवार स्मरण देऊनही आपल्याला संपूर्ण व योग्य माहिती मिळाली नाही. सहा मुद्दयांबाबतची माहिती शोध मोहीम राबवून निःशुल्क उपलब्ध करून द्यावी, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांना दिला. तरीही आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून आपल्याला माहिती मिळाली नाही. आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. नागकुमार कुणचगी प्रथम अपिलाच्या सुनावणीला कधीही उपस्थित राहिले नाहीत. त्यांनी दिलेले लेखी म्हणणे माहिती नाकारणारे आहे, म्हणून श्री. बनसोडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. बनसोडे यांनी मागितलेली माहिती २० वर्षांपूर्वीची होती. उपलब्ध असलेली माहिती त्यांना त्वरित देण्यात आली. सन १९८४ ते १९८६ या कालावधीत वैद्यकीय विभाग व आरोग्य विभाग एकत्र होते, ते वेगवेगळे झाल्यानंतर अभिलेखही त्या त्या विभागाकडे वर्ग झाले. महानगरपालिकेच्या अभिलेख कक्षाकडे तपासणी करून जे अभिलेख उपलब्ध झाले नाहीत व ज्यांच्या जतनाचा कालावधी संपुष्टात आला होता त्याबाबत श्री. बनसोडे यांना कळविण्यात आले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्णयानुसार महानगरपालिकेच्या सर्व दवाखान्यांमध्ये व रुग्णालयांमध्ये शोध मोहीम राबवून काही कागदपत्रे उपलब्ध झाली, ती श्री. बनसोडे यांना देण्यात आली. अन्य माहिती उपलब्ध होणे शक्य नसल्याचे व त्यामुळे लेखा परीक्षण आक्षेपही निरस्त झाले नसल्याचे आपण श्री. बनसोडे यांना स्पष्ट करूनही त्यांना ते मान्य नाही, असे जन माहिती अधिकारी तथा आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. नागकुमार कुणचगी व अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी श्री. सुभाष डुंबरे यांनी नमूद केले. उपलब्ध

नसल्याचे सांगितले जाणारी कागदपत्रे महानगरपालिकेच्या अभिलेखात उपलब्ध आहेत व ती कोठे आहेत हे आपण दाखवू शकतो, असे प्रतिपादन श्री. बनसोडे यांनी केले. जतनाच्या कालावधीनुसार मुदत उलटलेली कागदपत्रे दिली जाणार नाहीत, मात्र अपीलकर्त्याने त्यांच्या म्हणण्याप्रमाणे रुग्णालयामध्ये समक्ष पाहणी करून हे अभिलेख दाखवावे व त्यानुसार त्यांना हवी असणारी माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी निःशुल्क द्यावी, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला.

अभिलेख अवलोकनाऐवजी श्री. बनसोडे यांनी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्या नावे दिली. अभिलेख अवलोकनासाठी त्यांना दोन पत्रे पाठविली. परंतु त्यांनी ती स्वीकारली नाहीत, व त्यानंतरही माहितीबाबत अद्याप त्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांशी संपर्क साधलेला नाही, असे अनुपालन अहवालाच्या अनुषंगाने आयोगाने विचारणा केल्यानंतर दि. २७.८.२००९ च्या अहवालान्वये जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे यांनी आयोगास अवगत केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३१.८.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.बाळासाहेब कृष्णा माळी
२१८, आर.के.नगर हौसिंग सोसायटी नं.४, कोल्हापूर-४१६०१३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५६+१६९+१७० / कोल्हापूर / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९.७.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.धनंजय डोईफोडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.३.२००७(तीनही अर्ज) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.४.२००७(अ.क्र.१५६)<br>दि.९.४.२००७ (अ.क्र.१६९)<br>दि.२०.३.२००७(अ.क्र.१७०) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१४.५.२००७(अ.क्र.१५६)<br>दि.१८.४.२००७(अ.क्र.१६९,१७०) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१४.५.२००७(अ.क्र.१५६)<br>दि.२९.१०.२००७(अ.क्र.१६९)<br>दि.३.५.२००७ (अ.क्र.१७० |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
|---|---|
| | **अ.क्र.१५६**-मानिनी महिला पतसंस्थेचे फेरलेखापरीक्षण (कालावधी २२.८.२००६ ते १६.३.२००७) करण्यासाठी किती वेळ लागणार आहे किंवा होणारच नाही?<br>**अ.क्र.१६९**-श्री शरदचंद्र सहकारी गृहनिर्माण संस्था, कागल यांच्याकडील दि.२२.१०.२००३ ते दि.१६.३.२००७ या कालावधीतील लेखापरीक्षणांच्या प्रती, कर्जप्रकरणासाठी दिलेल्या कोल्हापूर डी.सी.सी.बँक यांच्याशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती, तसेच मंत्रालयाशी झालेला पत्रव्यवहार, गृहनिर्माण योजनेसाठी मिळालेल्या शासनमंजुरी आदेशाची प्रत, सदर संस्था स्थापन करताना असलेल्या संचालक मंडळ, सभासद व बदल झालेल्या आजपर्यंतच्या संचालक मंडळ व सभासद यांचे नाव व पत्ते.<br>**अ.क्र.१७०**-श्री शाहू औद्योगिक सहकारी संस्था, कागल या संस्थेची नोंदणी रद्द होऊन श्री शरदचंद्र सहकारी गृहनिर्माण संस्था असे रुपांतर केले, त्या आदेशाची प्रत, याबाबत झालेला पत्रव्यवहार, रुपांतरीत झाल्यानंतर सर्व संचालक मंडळाची नावे व पत्ते. |

## विवेचन

सहकारी गृहनिर्माण संस्था व सहकारी पतसंस्था याबद्दलची माहिती अपीलकर्ता श्री.बाळासाहेब कृष्णा माळी यांनी जन माहिती अधिकाऱ्यांकडे मागितली होती. त्यांच्याकडून माहिती मिळाली नाही / विहित मुदतीत मिळाली नाही, या कारणावरुन श्री.माळी यांनी राज्य माहिती आयोगाकडे तीन अपिले केली आहेत.

आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे दि.१३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. माहिती घेऊन जाण्याबद्दल अपीलकर्ता यांना कळविण्यात आले. परंतु त्यांनी माहिती नेली नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले. अपीलकर्ता गैरहजर होते, त्यामुळे सदर अपील सुनावणीसाठी घेण्यात आले. त्यावेळीही अपीलकर्ता गैरहजर होते.

**अ.क्र.१५६**-मात्र मानिनी सहकारी पतसंस्थेच्या फेर लेखापरीक्षणाला किती कालावधी लागणार आहे किंवा फेर-लेखापरीक्षण होणारच नाही का अशी विचारणा केली होती. सक्षम अधिकाऱ्याकडे अर्ज वर्ग करण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी यांनी दिला. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था यांनी श्री.माळी यांना माहिती दिली आहे, असे जन माहिती

अधिकारी श्री.टी.जी.कुरणे व अपिलीय प्राधिकारी श्री.धनंजय डोईफोडे यांनी आयोगापुढील सुनावणीत पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

**अ.क्र.१६९**-श्री शरदचंद्र सहकारी गृहनिर्माण संस्था, या संस्थेच्या नोंदणी कागदपत्राच्या प्रती व अन्य माहिती श्री.माळी यांनी मागितली होती.

**अ.क्र.१७०**-श्री शाहू औद्योगिक सहकारी संस्थेच्या नोंदणी कागदपत्रांच्या प्रती व या संस्थेची नोंदणी रद्द होऊन श्री शरदचंद्र सहकारी गृहनिर्माण संस्था असे तिचे रुपांतर झाले, त्याबाबतच्या कागदपत्रांच्या प्रती श्री.माळी यांनी मागितल्या होत्या.

'श्री शाहू औद्योगिक सहकारी वसाहत मर्यादित, कागल या संस्थेची नोंदणी दि.१२.१०.२००३ च्या आदेशाने रद्द केली आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा कलम ११०(५) नुसार नोंदणी रद्द केलेले व कामकाज समाप्त केलेले संस्थेचे रेकॉर्ड दोन वर्षानंतर नष्ट केले जाते. या संस्थेचे रुपांतर झालेल्या शरदचंद्र गृहनिर्माण संस्था मर्यादित, कागल या संस्थेला कोणत्याही स्वरुपात शासकीय मदत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही. मात्र रुपांतर आदेशाच्या प्रती व सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, कागल यांच्या कार्यालयाकडे असलेली या संदर्भातील माहिती अपीलकर्त्याने शुल्क भरल्यानंतर देण्यात येईल,' असे पूर्वीच अपीलकर्त्याला कळविण्यात आले आहे, असे जन माहिती अधिकारी श्री.टी.जी.कुरणे व अपिलीय प्राधिकारी श्री.धनंजय डोईफोडे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची निवेदने व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती देण्याबाबत योग्य कार्यवाही केली आहे.

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि.७.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.जितेंद्र भानुशंकर मेहता
प्लॉट नं.३२०, फ्लॅट नं.२, सेक्टर नं.२६,
महावीर कॉम्प्लेक्स, पीसीएनटी, निगडी, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कर आकारणी व करसंकलन प्रमुख,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी (कर),
निगडी प्राधिकरण विभागीय कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५६२ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कर आकारणी व करसंकलन प्रमुख,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.साहेबराव गायकवाड

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी (कर),
निगडी प्राधिकरण विभागीय कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे
श्री.तुकाराम विठोबा कांदळकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.९.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.१२.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>जानेवारी १९९७ ते जून २००७ या कालावधीत किती इमारत पूर्णत्व व ऑक्युपन्सी प्रमाणपत्र पार्ट-ब महानगरपालिकेस पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडून प्राप्त झाले. त्याप्रमाणे किती इमारतींची कर आकारणी करण्यात आली, यावेळी किती तक्रारी आल्या, यापैकी किती तक्रारींची पूर्तता करण्यात आली व किती नाकारण्यात आली, त्यासाठी किती वेळ लागला, त्यामध्ये किती दिवाणी दावे घर/इमारत मालकांनी केले, त्यातील किती निर्णय झाले, किती राहिले आहेत. वरील सर्व माहिती महिन्याप्रमाणे व सेक्टरवाईज द्यावी. | |

## विवेचन

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण हद्दीतील मिळकतीच्या कर आकारणीविषयीची जानेवारी १९९७ ते जून २००७ या काळातील माहिती अपीलकर्ता श्री.जितेंद्र भानुशंकर मेहता यांनी मागितली होती. दहा वर्षाच्या काळातील व विस्तृत माहिती असल्यामुळे कार्यालयात येऊन अभिलेखाचे समक्ष निरीक्षण करावे व त्यानंतर आपल्याला हवी असलेली माहिती दिली जाईल, असे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी (कर), निगडी-प्राधिकरण विभागीय कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी कळविले. परंतु श्री.मेहता यांनी त्याला नकार दिला व आपण मागितल्याप्रमाणे जन माहिती अधिकाऱ्यांनी स्वत: माहिती द्यावी, असे दि.१२.९.२००७ च्या पत्राद्वारे कळविले. त्यानंतर दि.१४.९.२००७ राजी जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविलेले शुल्क श्री.मेहता यांनी भरले नाही, तसेच ४२ पानी तक्ते करुन पाठविले व आपल्याला कोणत्याही कागदपत्रांच्या प्रती नको असून आपण पाठविलेल्या तक्त्यातच जन माहिती अधिकारी यांना माहिती संकलित करुन पाठवावी, असे दि.१७.९.२००७ च्या पत्रान्वये कळविले. दि.१८.९.२००७ रोजी जन माहिती अधिकाऱ्यांनी शुल्काबाबत पुन्हा कळविल्यानंतर श्री.मेहता यांनी दि.२९.९.२००७ च्या पत्रान्वये शुल्क भरण्यास नकार दिला व आपल्याला कागदपत्रांच्या प्रती नको असून माहिती हवी आहे व ती आपण दिलेल्या ४२ पानी नमुन्यातच हवी आहे, असे पुन्हा कळविले. तसेच 'आता

संपर्क २० ऑक्टोबरनंतरच साधावा,’ असेही कळविले. जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री.मेहता यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे माहिती समक्ष नेण्यास दि.२४.१०.२००७ रोजी कळविले. ते न आल्यामुळे कर्मचाऱ्यांकरवी माहिती पाठविली, ती त्यांनी स्वीकारली नाही, टपालाने पाठविण्याचा खर्चही देण्यास त्यानी नकार दिला. यानंतर स्पीड पोस्टाने त्यांना माहिती नि:शुल्क पाठविण्यात आली. परंतु आपल्याला अपुरी व चुकीची माहिती मिळाल्याच्या कारणावरुन श्री.मेहता यांनी अपिलीय प्राधिकारी तथा करआकारणी व करसंकलन प्रमुख, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. जन माहिती अधिकाऱ्यांनी सर्व माहिती दिली असल्याचे व अपीलकर्त्याने दिलेल्या नमुन्यात न बसणारी माहिती समाविष्ट नसल्याचे नसल्याचे नमूद करुन अपील अंशत: मंजूर केले व ‘अर्जदार दस्तऐवज घेण्यास, फी भरण्यास व कागदपत्रे पाहण्यास तयार नसल्याने सदर माहिती संकलित करुन शक्य तेवढ्या लौकर देणे योग्य होईल असे वाटते,’ असे नमूद करुन ४१ प्रकरणाच्या कारणांबाबत माहितीचे दस्तऐवज, प्रकरणनिहाय प्रती जन माहिती अधिकाऱ्यांनी दहा दिवसात पाठवाव्यात] असा निर्णय दिला. त्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी प्रती पाठविल्या. परंतु आपल्याला खोटी, अपुरी , विसंगत माहिती व जाणीवपूर्वक विलंब करुन दिली, तसेच नको असलेल्या माहितीच्या छायांकित प्रती मोठ्या प्रमाणात दिल्या, या कारणावरुन श्री.मेहता यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आपण दिलेल्या नमुन्यात माहित देण्याचे मान्य केल्यानंतर शुल्क मागणी करणे गैर आहे. ‘हा नमुना त्यांना मान्य असेल तर’ असे आपण पत्रात म्हटले होते. परंतु एकदा हा नमुना स्वीकारल्यानंतर शुल्क भरण्याचा प्रश्नच येत नाही, शुल्क भरणे आपण नाकारलेले नाही, इत्यादी स्वरुपाचे मुद्दे मांडणारे सविस्तर लेखी निवेदन श्री.मेहता यांनी सादर केले आहे. श्री.मेहता यांना स्वत:च्या मिळकतीची आकारणी त्यांच्या मनाप्रमाणे करुन हवी असल्यामुळे सातत्याने ते अर्ज करीत असतात, असे श्री.मेहता यांच्या यापूर्वीच्या अपिलातही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकरी यांनी नमूद केले होते. त्याचाच पुनरुच्चार जन माहिती अधिकारी श्री.तुकाराम कांदळकर व अपिलीय प्राधिकारी

श्री.साहेबराव गायकवाड यांनी आयोगापुढील सुनावणीत केला. श्री.मेहता विस्तृत माहिती मागतात, त्यासाठीचे शुल्क भर नाहीत व टपालाने पाठविल्यास तोही खर्च देत नाहीत. त्यांनी दिलेल्या नमुन्यातच माहिती देण्याचा आग्रह धरतात, असे प्रतिपादन त्यांनी केले.

उभय बाजूंनी दाखल केलेली कागदपत्रे विचारात घेता श्री.मेहता एकाच स्वरुपाची माहिती विविध अर्जांद्वारे सातत्याने मागत आहेत व ते स्वतःची म्हणत असलेल्या मिळकतीची त्यांना अपेक्षित असल्याप्रमाणे कर आकारणी आकारणे ही त्यांची मूळ मागणी आहे, असे दिसते. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती संकलित करुन देणे रास्त असले तरी अपीलकर्त्याने अभिलेखाचे अवलोकन स्वतः न करता ४२ पानी तक्ते करुन द्यावेत व जन माहिती अधिकाऱ्यांनी सर्व तक्ते भरुन द्यावेत ही अपेक्षा अवाजवी आहे. आपण दिलेल्या तक्त्यात माहिती भरुन दिली जात असल्यामुळे शुल्क भरण्याचे कारण नाही, ही अपीलकर्त्याची भूमिका नियमबाह्य आहे. दिल्या जाणाऱ्या माहितीचे शुल्क अपीलकर्त्याने भरणे आवश्यक आहे. अपीलकर्त्याची एकूणच भूमिका आपण म्हणतो तसेच झाले पाहिजे व तेच बरोबर आहे अशी असल्याचे त्यांच्या निवेदनावरुन व पत्रव्यवहारावरुन दिसते. माहितीच्या अधिकारात अशा प्रकारे जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्याच्या अटीनुसार काम करणे अपेक्षित व बंधनकारक नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२९.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.राजेंद्र शंकरराव मोरे
मु.पो.आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर-४१६५०५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६१ / कोल्हापूर / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९.७.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर डॉ.ए.बी.जोगदंड

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर श्री.धनंजय डोईफोडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.३.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
|---|---|
| | अपीलकर्ता स्वत: श्री.शामराव मोरे यांच्या सन १९९८ च्या तारण कर्ज प्रकरणाला जामीनदार आहे, त्या कर्जप्रकरणातील कागदपत्रांच्या सहीशिक्क्याच्या नकला, इचलकरंजी जनता सह.बँक, शाखा आजरा व हेडऑफिस यांच्याकडून कर्जमंजुरी पत्रक (सँक्शन लेटर), सर्च रिपोर्ट, व्हॅल्युएशन ऑफ प्रॉपर्टी व कापडांची खरेदी बिले यांच्या नकला, दि.२९ एप्रिल १९९९, दि.२०एप्रिल १९९९ व २९ एप्रिल २००० रोजी कर्जखात्याला भरुन घेतलेल्या कॅश सर्टिफिकेटच्या छायांकित प्रती व त्यांचे खातेउतारे. |

## विवेचन

इचलकरंजी जनता सहकारी बँकेकडील आपण जामीन असलेल्या प्रकरणातील कागदपत्रे अपीलकर्ता श्री.राजेंद्र शंकरराव मोरे यांनी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्याकडे मागितली होती. संबंधित माहिती आपल्या कार्यालयाच्या अभिलेखातील नाही, तसेच नागरी सहकारी पतसंस्था व सहकारी बँका यांना माहितीचा अधिकार अधिनियम लागू होत नाही, असे कळवून जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक यांनी हा अर्ज, अर्जासंबंधीच्या सर्व कागदपत्रांच्या प्रती श्री.मोरे यांना देण्याच्या सूचनांसह बँकेकडे वर्ग केला. यानंतर श्री.मोरे यांनी व्यवस्थापक व वसुली अधिकारी, इचलकरंजी जनता सहकारी बँक, इचलकरंजी, शाखा आजरा यांच्याकडे कागदपत्र मागणारा अर्ज केला. बँकेने कागदपत्रे न दिल्यामुळे श्री.मोरे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. दरम्यान बँक राज्य पातळीवरील असल्यामुळे अपिलाची सुनावणी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कक्षेत येते, असे कळवून विभागीय सहनिबंधकांनी अपील त्यांच्याकडे वर्ग केले. परंतु 'विभागीय सहनिबंधक यांनीच सुनावणी देऊन कार्यवाही करावयाची आहे, असे कळवून अप्पर सहकार आयुक्त व निबंधक यांनी अपील पुन्हा विभागीय सहनिबंधकांकडे पाठविले. त्यांनी घेतलेल्या सुनावणीच्या दिवशी बँकेचे प्रतिनिधी श्री.ज.मा.पाटील यांनी दि.१२.३.२००७ पर्यंत माहिती देण्याचे मान्य केले,

व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी जन माहिती अधिकाऱ्याची कृती योग्य ठरवून अपील नामंजूर केले. म्हणून श्री.मोरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे दि.१३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे सदर अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

श्री.राजेंद्र मोरे हे बँकेचे थकबाकीदार असून बँकेने त्यांच्याविरुध्द सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर येथे वसुली अर्ज दाखल केला आहे व श्री.मोरे यांनी बँकेविरुध्द सहकार न्यायालय क्र.२, कोल्हापूर येथे बँकेच्या कर्ज वसुलीस मनाई मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. श्री.मोरे यांनी मागणी केलेले कागद या दोन्ही दाव्यांच्या कामी बँकेने हजर केलेले आहेत, असे बँकेचे व्यवस्थापक (सर्वसाधारण) यांनी दि.२६.११.२००७ रोजी आयोगाने केलेल्या विचारणेनुसार सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम सहकारी बँकांना लागू नसल्याचा उल्लेखही त्यांनी या निवेदनात केला आहे. संबंधित माहिती बँकेच्या अभिलेखाकडील असून ती अर्जदारास उपलब्ध करुन देणे योग्य व कायदेशीर आहे, असे सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी बँकेचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दि.१३.५.२००८ रोजी पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे. संबंधित माहिती श्री.मोरे यांना आठ दिवसात देण्याबाबत अपिलीय प्राधिकाऱ्यांनी बँकेला कळवावे, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था श्री.धनंजय डोईफोडे यांनी व्यवस्थापक, कल्लाप्पा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँक लि.,इचलकरंजी यांना कळविले. परंतु आपल्याला माहिती मिळालेली नाही व त्यामुळे आपले ठेवीच्या रकमा मिळणे अवघड होऊन फार मोठे नुकसान होत आहे, असे निवेदन श्री.मोरे यांनी राज्य माहिती आयोगाला सादर केले. मात्र 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रातील नोंद पाहता काही माहिती अपीलकर्त्याला देण्यात आली असल्याचे दिसून येते. ऊर्वरित माहिती सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्याकडील वसुली प्रकरणातून अथवा सहकार न्यायालय क्र.२, कोल्हापूर यांच्याकडून

अपीलकर्ता प्राप्त करुन घेऊ शकतील. मात्र आजवर अपीलकर्त्यास माहिती मिळण्यास झालेला विलंब लक्षात घेता अपिलीय प्राधिकारी असलेले विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी ही माहिती अपीलकर्त्यास प्राप्त करुन द्यावी.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती १५ दिवसांत प्राप्त करुन द्यावी, व अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१०.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.साईनाथ चंद्रकांत लाखे
मोनिका बिल्डिंग नंबर /बी फ्लॅट, नंबरएस/१,
भैरवनगर, काटे पिंपळे रोड, पिंपरी गाव, पुणे-१७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहायक आयुक्त(प्रशासन),
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी (आस्थापना),
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७२६ /पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.साईनाथ चंद्रकांत लाखे
मोनिका बिल्डिंग नंबर /बी फ्लॅट, नंबरएस/१,
भैरवनगर, काटे पिंपळे रोड, पिंपरी गाव, पुणे-१७

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहायक आयुक्त(प्रशासन),
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी (आस्थापना),
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.१२.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>श्री.के.के.अंकोलीकर यांच्यावरील आरोप खातेनिहाय चौकशी सिध्द झाल्याने त्यांना प्रशासनाकडील आदेश क्र.प्रशा/६/कावि/१/०५, दि.३१.१.१.२००५ अन्वये शास्ती करण्यात आलेली आहे. तसेच श्री.अंकोलीकर यांचा निलंबन कालावधी नियमित करण्यात आलेला आहे. निलंबन कालावधी ज्या मान्य प्रस्तावानुसार नियमित केला त्याची सत्यप्रत. | |

## विवेचन

जकात निरीक्षक श्री.के.के.अंकोलीकर यांचा निलंबन कालावधी मान्य केल्याच्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी(आस्थापनास), पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (प्रशासन), पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांच्या पातळीवर न मिळाल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री.साईनाथ चंद्रकांत लाखे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.लाखे यांनी दि.१६.१०.२००६ रोजी जकात विभागातील कर्मचाऱ्यांवरील कारवाईच्या संदर्भात सविस्तर माहिती मागणारा अर्ज केला होता. त्यावेळी दिलेल्या माहितीमध्ये श्री.अंकोलीकर यांचा सेवा निलंबन नियमित करण्याविषयीच्या आदेशाची प्रत व संबंधित कार्यालयीन टिपणीची प्रत त्यांना देण्यात आली होती. याच संदर्भात त्यांनी पुन्हा दि.९.१०.२००७ रोजी अर्ज केला. दि.२५.१०.२००७ च्या पत्रान्वये त्यांना माहिती देण्यात आली, असे जन माहिती अधिकारी श्री.बी.जी.पवार व अपिलीय प्राधिकारी श्री.सुधाकर देशमुख यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. आपल्याला संबंधित प्रस्तावाची प्रत हवी होती, ती दिली गेली नाही, असे प्रतिपादन श्री.लाखे यांनी केले. मात्र त्यांचा निलंबन कालावधीबाबतचा निर्णय मंजूर आदेशानुसार घेण्यात आला असून त्याची प्रत देण्यात आलेली आहे, असे जन माहिती अधिकारी श्री.बी.जी.पवार व अपिलीय

प्राधिकारी श्री.सुधाकर देशमुख यांनी स्पष्ट केले. आपल्याला माहिती मिळाली नसल्याची तक्रार श्री.लाखे यांनी दि.१०.१०.२००८ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. परंतु जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची निवेदने व त्यांनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता माहिती देण्यात आली आहे, असे दिसते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२५.८.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम, १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १७४४/ पुणे | कु. संगिता प्रकाश आमले द्वारा पी. व्ही. आमले १ -२/ २९९, महाराष्ट्र हौ. सो. गोखलेनगर, पुणे -१६ | जन माहिती अधिकारी , टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे -३० | प्राचार्य, टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे -३० | महाविद्यालयातील बिंदू नामावली (रोस्टर), व्याख्याता (अनुसूचित जमाती) बाबतची साक्षांकित प्रत | सन १९७६- ७७ पासूनचे (रोस्टर) बिंदु नामावली दि.२.०३.२००९ पर्यंत (नोंदणीकृत डाकेने) अर्जदारास पाठवित असल्याचे अपिलीय प्राधिकारी यांनी दि. २४.०२.०९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | १८०१/ पुणे | श्री. मधुकर नारायण कान्हे १६३/२, शुक्रवार पेठ, केवटे बिल्डिंग ३ रा मजला, पूर्व, पुणे -२ | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय भोर, जि. पुणे | तहसीलदार, तहसील कार्यालय भोर, जि. पुणे | आरटीएस/२/३६६/ २००२ दि.२८.११.०६ चे आदेशाचे निर्णयानुसार व उपविभागीय अधिकारी, भोर उपविभाग पुणे क्र. आरटीएस दि. /अ / १ / ०४/ दि.१७.१०.०५ चे आदेशानुसार एकत्रिकरणांतर्गत गटाच्या रेकॉर्डविषयी | संपादनाचा दाखला हा विषय भूसंपादन अधिकाऱ्याशी निगडीत असला तरीही संबंधित विभागाकडे पाठपुरावा करून माहिती देण्याचा प्रयत्न करत आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. ३०.०४.०९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | दि.११.१२.०७ रोजी दिलेल्या अर्जावरील पुढील कार्यवाहीची माहिती. | |
| ३ | १९११/ पुणे | श्री. शशिकांत विश्वनाथ भोसले संस्कार गृहरचना संस्था, प्लॉट नं ९७/१० एम., गोल्फ क्लब रोड, येरवडा, पुणे -६ | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय पौड(मुळशी), ता. मुळशी, पुणे | तहसीलदार पौड (मुळशी), तहसील कार्यालय, पौड (मुळशी), ता. मुळशी, पुणे | श्रीम. धोंडाबाई लक्ष्मण डोळस यांचे मृत्युपत्रामधील वारसदारांनी स. नं. ६/६/२ मौजे हिंजवडी ता. मुळशी जि. पुणे येथील शेतजमिनीचे ७/१२ उताऱ्यावर मालकी हक्क नोंदणीबाबत केलेल्या अर्जावरील कार्यवाहीची तपशीलवार माहिती. | दि. ३०.०४.२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मध्ये चर्चेनंतर अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यामध्ये अपील निकाली काढण्याबाबत एकमत झाल्याचे संयुक्तपणे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | २३८६/ पुणे | श्री. अंजीर झुंबर जाधव ए -९/००३, नमो रेसिडेन्सी, वर्धमान टाऊनशिप, ससाणे नगर, हडपसर, पुणे २८ | जन माहिती अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. ३, कामगार न्यायालया-च्यावर, २ रा मजला, पी. एम. टी. बिल्डिंग, स्वारगेट, पुणे - ४२ | सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. ३, कामगार न्यायालयाच्यावर, २ रा मजला पी. एम.टी. बिल्डिंग, स्वारगेट, पुणे - ४२ | दि. २७.०४.२००६ रोजीच्या जात पडताळणी प्रकरण क्र. १०८० बाबतची व पोलीस पडताळणीच्या सर्व कागदपत्रांच्या प्रती. | दि.२०.०१.२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मधील चर्चेनुसार अपीलकर्त्यांस दि. १३.२. ०९ रोजी जात पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त झाले असल्याने, आता कोणतीही तक्रार नाही, असे अपीलकर्त्याने दि. १३.२.२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना कळविले असून सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. २ यांनी त्यानुसार आयोगास दि. ३.७.२००९ च्या पत्राने अवगत केले आहे. |
| ५ | २४५०/ पुणे | १)श्री. नारायण दगडोबा पाषाणकर | नगर अभियंता, बांधकाम | उप आयुक्त विभागीय कार्यालय क्र. १, | पाषाण घर नं. २१, स.नं. ११४/१४ वरील अनधिकृत | अर्जदारांना सबंधित विभागाकडून आठ दिवसांत माहिती उपलब्ध |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २) श्री. हरिश्चंद्र दगडोबा पाषाणकर रा. घर नं. २१, पाषाण, पुणे-८ | नियंत्रण विभाग, औंध वॉर्ड ऑफीस, पुणे महानगर-पालिका पुणे -७ | पुणे महानगरपालिका, घोले रोड, पुणे-५ | बांधकाम पाडण्यासाठी पुणे महानगरपालिकेने केलेला खर्च वसुलीबाबतची माहिती. | करून देण्यात येईल, असे अपिलीय प्राधिकारी यांनी दि. २९.१.२००९ चे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ६ | २५१४/ पुणे | श्री. ज्ञानेश्वर बापूराव परभाणे मु. पो. वडगाव रासाई, ता. शिरुर, जि. पुणे | सहायक निबंधक- १, सहकारी संस्था, अधीन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था. पुणे साखर संकुल शिवाजीनगर, पुणे-५ | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था पुणे, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ | विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग पुणे यांच्या पत्राच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील. | अपीलकर्त्यास आठ दिवसांत माहिती देऊन त्यानुसार अहवाल सादर करण्यात येईल, असे दि. २०.१.२००९ चे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रामध्ये जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले असून दि. २७.१.२००९ रोजी अनुपालन अहवाल आयोगास सादर केला आहे. |
| ७ | २८२९/ पुणे | श्री. ज्ञानेश्वर मुरलीधर भोसले रा.तरडोबाची-वाडी, ता. शिरुर, जि पुणे | जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (प्रशा.-१), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे | अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प्रशा.-१), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या., शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे | दि.२.९.०८ ते १८.१०.०९ पर्यंत शिरूर शहररामध्ये व ग्रामीण तसेच उपविभागाकडे घरगुती, शेतीपंप व इतर सिंगलफेज, थ्रीफेज कनेक्शन दिलेल्या व्यक्तींची यादी. | दि. ५.६.२००९ पर्यंत माहिती देत आहोत व अहवाल सादर करीत आहोत, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. २७.५.०९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रामध्ये नमूद केले असून त्यानुसार दि. ४.६.२००९ रोजी अनुपालन अहवाल आयोगास सादर केला आहे. |
| ८ | २१७१/ पुणे | श्री. अर्जुन नारायणराव लाटे २३ बी, गोलधर | जन माहिती अधिकारी, पुरातत्व व वस्तु | अपिलीय प्राधिकारी तथा संचालक पुरातत्व व वस्तु संग्रहालय | संचालकांना संबोधलेले दि. २९.९.२००७ चे पत्रावर केलेली | आयोगाने दि. ३.६.२००९ चे पत्रान्वये आदेशित केल्याप्रमाणे अपीलकर्ता श्री. लाटे यांना |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | जनवाडी. पुणे -१६ | संग्रहालय संचालनालय, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, मुंबई -१ | संचालनालय, सेंट जॉर्ज किल्ला, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, मुंबई-१ | कार्यवाही, नस्तीतील टिपण्या इ. माहिती. | मागितलेली माहिती त्यांना दिल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा संचालका यांनी दि.१३.६.०९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केलेले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील नमूद केलेली अनुक्रमांक १ ते ८ अपिले (अपील क्र. १७४४/पुणे, १८०१/पुणे, १८९१/पुणे, २३८६/पुणे, २१७१/पुणे, २४५०/पुणे, २५१४/पुणे, २८२९/पुणे व २१७१/पुणे) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्र. १७४४/पुणे, १८०१/पुणे व २४५०/ पुणे प्रकरणी मध्ये जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती देण्याबाबत नमूद/ आश्वासित केलेले आहे. त्यानुसार सबंधित अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती देऊन अनुपालन अहवाल आयोगास आठ दिवसांत सादर करावा. अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये सबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

पुणे
दि. १८.०८.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.